वस्तू व सेवा कर विभागातील कर सहायक-गट क संवर्गातील पदाच्या विभागीय परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम बदलण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : विकअ ११२५/प्र.क्र.१८९/वि.प्र.-१/(ई. ऑ क्र.१८७६४३०)
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०२६

वाचा :-

१. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.विकवि १११११/प्र.क्र.१६५/विप्र१, दि.११.०६.२०१३
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विकवि १११७/प्र.क्र.१६६/विप्र१, दि.२२.०५.२०१८
३. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.विपधो २६२०/प्र.क्र.१६/का.१७, दि.३१.०३.२०२१
३. वस्तू व सेवा कर विभागाचे पत्र क्र.रासआ (प्र)/मुख्या-१०/अभ्यासक्र व नियमावली/२०२५-२६/ब-३०,मुंबई दि.११.०४.२०२५
४ वस्तू व सेवा कर विभागाचे पत्र क्र.रासआ (प्र)/मुख्या-१०/नियम मराठी भाषंतर /२०२५-२६/ब-३५३,मुंबई दि.२५.०८.२०२५
५ वस्तू व सेवा कर विभागाचे पत्र क्र.रासआ (प्रशिक्षण)/मुख्या-१०/अभ्यासक्रम निश्चित/२०२६-२७/ब-३५२,मुंबई दि.०१.०९.२०२६

प्रस्तावना :-

वस्तू व सेवाकर विभागाच्या आस्थापनेवर कर सहायक (गट क) हे पद दिनांक ०८/०८/२०१२ च्या शासन निर्णयान्वये नव्याने निर्माण करण्यात आले असून, कर सहायक पदाचे सेवाप्रवेश नियम दि.११ जून २०१३ च्या अधिसूचनान्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत.

कर सहायक संवर्गाचे विभागीय परीक्षा नियम तयार करण्यात आलेले नसल्याने, वित्त विभागाच्या दि.२२/०५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये वस्तू व सेवाकर विभागातील लिपिक-टंकलेखक कर्मचा-यांची विभागीय परीक्षा लिपिक कर्मचारी विभागीय परीक्षा नियम, १९७२ मधील (नियम ११) मधील तरतूद व दिनांक ०३/०५/२०१० च्या शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमानुसार घेण्यात येत होती. तथापी, महाराष्ट्र राज्यात दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून वस्तू व सेवा कर कायदा लागू झाल्यामुळे, वस्तू व सेवा कर कायद्याशी संबंधित अभ्यासक्रमाचा समावेश कर सहायक पदासाठी घेण्यात येणा-या विभागीय परीक्षेमध्ये समाविष्ट करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

वस्तू व सेवा कर विभागातील गट क संवर्गातील कर सहायक या पदाच्या विभागीय परीक्षेचा अभ्यासक्रम या शासन निर्णयासोबत जोडलेल्या "परिशिष्ट -अ" नुसार निश्चित करण्यात येत आहे.

कर सहायक संवर्गासाठी घेण्यात येणा-या विभागीय परीक्षेकरिता प्रश्नपत्रिका क्रमांक १ व ४ या वर्णनात्मक उत्तर पध्दतीची आहे, तर प्रश्नपत्रिका क्र.२ व ३ ही बहुपर्यायी असून प्रात्यक्षिकासह आहे.

प्रस्तुत परीक्षेतील प्रश्नपत्रिका क्रमांक १ व ४ करिता प्रत्येकी ३ तासांची वेळ तर प्रश्नपत्रिका क्रमांक २ करिता २ तासांची वेळ आणि प्रश्नपत्रिका क्रमांक ३ भाग १ व भाग २ करिता प्रत्येकी १ तास व ३० मिनिटांची वेळ निर्धारित करण्यात येत आहे.

वस्तू व सेवा कर विभागातील गट ड-सवंर्गातील कर्मचारी हे कर सहायक (गट -क) या पदोन्नतीच्या पदावर पदोन्नत झाल्यास, अशा कर्मचा-यास प्रस्तुत अभ्यासक्रम लागू राहील.

सदर सुधारित विभागीय परीक्षा अभ्यासक्रम व विभागीय परीक्षेचे स्वरूप सन २०२७ या परीक्षा वर्षापासून लागू राहील.

सदर शासन निर्णयाद्वारे केवळ विभागीय परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम यामध्ये बदल करण्यात येत असून, विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याचे परिणाम, पदोन्नती, सेवाज्येष्ठता, वेतननिश्चिती अथवा अन्य सेवा विषयक बाबींसंदर्भातील विद्यमान नियमांमध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही. अशा बाबींवर संबंधित विद्यमान सेवा नियम/शासन आदेशातील तरतुदी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन निर्गमित करण्यात येत असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६१११८१७१२५५०९०५ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHAITALI PRAMOD SAWANT

Digitally signed by CHAITALI PRAMOD SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Finance Department, 2.5.4.20=9486D28CF08F7C5A60531AF7F274E858C467F89C8664F159FD388B3B2A9BC8AD, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=77A0EC104EA8EACD51717DDCECA74A9E199E84811ABD4B614649592AE39284FE, cn=CHAITALI PRAMOD SAWANT
Date: 2026.11.18 17:13:46 +05'30'

(चैताली प्र. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत -परिशिष्ट -अ

प्रति,

१. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई-४०००१०
२. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई-४०००१०
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
४. राज्यकर सह आयुक्त (प्रशिक्षण), वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई-४०००१०
५. निवडनस्ती.

शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विकअ ११२५/प्र.क्र.१८९/वि.प्र.-१/(ई. ऑ क्र.१८७६४३०)

सोबतचे परिशिष्ट - अ

वस्तू व सेवा कर विभागाच्या आस्थापनेवरील कर सहायक गट क संवर्गातील कर्मचा-यांच्या विभागीय परीक्षेचे स्वरुप व अभ्यासक्रम

पेपर	भाग	विषय व त्यांचे गुण	गुण	पेपरचा कालावधी	पुस्तका सह/ पुस्तकां शिवाय
पेपर क्रमांक १ - विभागाकडून अंमलबजावणी करण्यात येणारे कर कायदे आणि नियम (पुस्तकांशिवाय)					
१	भाग-१ (७० गुण)	महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ आणि त्याअनुषंगाने बनविलेले नियम. (७० गुण)	१०० गुण	३ तास	पुस्तकां शिवाय
	भाग-२ (२०गुण)	महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा, २००२ (०१.०७.२०१७ नंतर) आणि त्याअनुषंगाने बनविलेले नियम. (२० गुण)			
	भाग-३ (५ गुण)	केंद्रिय विक्रीकर कायदा, १९५६ व त्याअनुषंगाने बनविलेले नियम (५ गुण)			
	भाग-४ (५ गुण)	महाराष्ट्र व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यावरील कर कायदा, १९७५ व त्याअनुषंगाने बनविलेले नियम. (५गुण)			
पेपर क्रमांक २ - कर कायद्यांच्या कार्यपध्दती (पुस्तकांशिवाय)					
२	भाग-१ (८० गुण)	वस्तू व सेवा कर कायद्याच्या विविध कार्यपद्धती व नियमावली,नमुने, अधिसूचना व परिपत्रके इ. (८० गुण) (नोंदणी, विवरण, कर भरणे (payment), विवरणांची छाननी, परतावा, परताव्याची छाननी,लेखापरीक्षण, कर निर्धारणा (adjudication), वसुली व अपील इ.)	१०० गुण	२ तास	पुस्तकां शिवाय
	भाग-२ (२० गुण)	मुल्यवर्धित कर कायद्याच्या कार्यपद्धतीची नियम पुस्तिका, महाराष्ट्र व्यवसाय कर इ. (२० गुण) (नोंदणी, विवरण, कर भरणे (payment), विवरणांची छाननी, परतावा, परताव्याची छाननी, लेखापरीक्षण, कर निर्धारणा (adjudication), वसुली, अपील व्यवसायकर माहितीपुस्तिका (Manual) इ.)			

पेपर क्रमांक ३ -संगणक व विभागाने अंगिकृत केलेली ऑटोमेशन पध्दती (लेखी व प्रात्यक्षिक) (पुस्तकांशिवाय)					
३	भाग-१ (लेखी) (५० गुण)	अ) एम.एस. एक्सेल (१० गुण) Creating, editing & managing worksheet, Using basic formulas & performing Calculation Presentation, formatting, finalizing Excel sheet, Working with rows, column & list, Filling data & series & basic filling, Excel basic shortcut & Protecting sheets, filters, data sorting, V lookup, pivot table, conditional formatting, wrap text, page layout, cell/row merging, convert to text, column, remove duplicates etc.	१०० गुण	१ तास ३० मिनिटे	पुस्तकांशिवाय
		ब) एम.एस.वर्ड (१० गुण) Drafting letters, formatting drafts, creating, editing and managing wordsheet, inserting table, cut, copy, paste, insert, delete, alignment, header, footer, paging, page layout, orientation & merging page, bold, underline, point font changing, find, replace, spell check and grammar check etc.			
		क) एम.एस. पावरपाईट (५ गुण)			
		ड) ई-मेल व मेल विलीनीकरण (Merging) (५ गुण)			
		इ) बॅक ऑफीस सिस्टीम (१५ गुण) (Processing Registration Application, Search Taxpayer Details, MIS Reports, Appeal, Refund, Assessment and Adjudication, Demand & Collection Register, Recovery and Enforcement etc.)			
		ई) Understanding IT and Networking System, Taking care of office IT Equipment (५ गुण)			

	भाग-२ (प्रात्यक्षिक) (५०गुण)	अ) एम.एस. एक्सेल (१० गुण) Creating, editing & managing worksheet, Using basic formulas & performing calculation, presentation, formatting, finalizing excel sheet, working with rows, column & list, Filling data & series & basic filling, Excel basic shortcut and Protecting sheets, filter, data sorting, V-lookup, pivot table, conditional formatting, wrap text, page layout, cell/row merging, convert to text, column, remove duplicates etc.		१ तास ३० मिनिटे	पुस्तकां शिवाय
		ब) एम.एस.वर्ड (१० गुण) Drafting letters, formatting drafts, creating, editing and managing wordsheet, inserting table, cut, copy, paste, insert, delete, alignment, header, footer, paging, page layout, orientation & merging page, bold, underline, point font changing, find, replace, spell check and grammar check etc.			
		क)एम.एस. पावरपाईट (५ गुण)			
		ड) ई-मेल व मेल विलीनीकरण (Merging) (५ गुण)			
		इ) बॅक ऑफीस सिस्टीम (१५ गुण) (Processing Registration Application, Search Taxpayer Details, MIS Reports, Appeal, Refund, Assessment and Adjudication, Demand & Collection Register, Recovery and Enforcement etc.)			
		ई) Understanding IT and Networking System, Taking care of office IT Equipment (५ गुण)			

पेपर-४ महाराष्ट्र नागरी सेवा नियम व इतर कायदे (पुस्तकांसहीत)					
४	भाग-१ (७५ गुण)	१)महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ (१० गुण)	१०० गुण	३ तास	पुस्तकां सह
		२) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ (५ गुण)			
		३) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ (५ गुण)			
		४) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा, निलंबन इ.),नियम १९८१ (१० गुण)			
		५) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी, नियम १९९८ (५ गुण)			
		६) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) व (शिस्त व अपील) नियम १९७९ (२० गुण)			
		७) सेवार्थप्रणाली (१० गुण)			
		८) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ आणि त्यासंबंधी सरळसेवा भरती व पदोन्नतीमध्ये आरक्षण इ. (१० गुण)			
	भाग-२ (५ गुण)	माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (५ गुण)			
	भाग-३ (५ गुण)	महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २००५ (५ गुण)			
	भाग-४ (५ गुण)	महाराष्ट्र शासकीय कामकाजात विलंब करणेस प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ (५ गुण)			
	भाग-५ (५ गुण)	आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ (५ गुण)			
	भाग-६ (५ गुण)	महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा, २००५ (५ गुण)			
